बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

आज़ादी का अमृत महोत्सव

**निगमित संप्रेषण व निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 487

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्र कडून रिटेल बोनान्झा – धमाकेदार मान्सून ऑफर

**पुणे दिनांक २९ जुलै २०२२ :** देशाची सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने दिनांक १ ऑगस्ट २०२२ पासून आपल्या ग्राहकांसाठी रिटेल बोनान्झा द्वारे धमाकेदार मान्सून ऑफर देऊ केली आहे. महासुपर गृहकर्ज योजना व कार वाहन कर्ज योजनेवरील प्रक्रिया शुल्क बँकेने माफ केले आहे.

" आम्ही आमच्या रिटेल कर्ज ग्राहकांसाठी अतिशय आकर्षक सवलती जाहीर केल्या असून ' रिटेल बोनान्झा – धमाकेदार मान्सून ऑफर " सवलत योजनेद्वारे सणासुदीच्या काळात ग्राहकांचा आनंद द्विगुणीत करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे." असा अभिप्राय बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी नोंदविला.

" सणासुदीच्या काळात मान्सून धमाका योजनेचा लाभ घेऊन आमच्या ग्राहकांनी अधिकाधिक गृहकर्जे व कार वाहन खरेदीसाठी कर्जे घेऊन कमी झालेले व्याजदर आणि शून्य प्रक्रिया शुल्क अशा सवलतींचा लाभ ग्राहकांनी घ्यावा व आपला सणासुदीचा आनंद द्विगुणीत करावा " असे बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी सांगितले.

" या सवलती देऊ केल्यामुळे ग्राहकांचा आनंद सणासुदीचा द्विगुणीत होईलच, त्याशिवाय बँकेच्या रिटेल व्यवसायात सुद्धा वाढ होईल. ही सगळ्यांसाठीच फायद्याची अशी बाब असून अधिकाधिक मान्यवर ग्राहक बँक ऑफ महाराष्ट्रशी यानिमित्ताने जोडून घेण्याचा आमचा प्रयत्न व अपेक्षा असे बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री आशिष पांडे यांनी सांगितले.

आपल्या रिटेल ग्राहकांचा सणासुदीचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्रने अनेक धमाकेदार सवलती देऊ केल्या आहेत. बँकेने वार्षिक ७.३० % व्याजदराने गृहकर्ज व ७.७० % व्याजदराने कार खरेदी करण्यासाठी कर्ज देऊ केले आहे. तसेच गृहकर्जाचे सर्व सामिकृत मासिक हप्ते नियमितपणे परतफेड केल्यास तीन हप्त्यांची सवलत, गृहकर्ज व कार वाहनाच्या खरेदीसाठी एकूण किमतीच्या ९० % पर्यंत कर्ज, तसेच कर्ज रक्कम नियत कालावधीच्या अगोदर पूर्णपणे किंवा अंशतः परतफेड केल्यास कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येणार नाही ; अशा अत्यंत आकर्षक सवलती बँक ऑफ महाराष्ट्रने देऊ केल्या आहेत.

बँकेने वार्षिक ७.७० % व्याजदराने रु २५.०० लाख रकमे पर्यंत सोने कर्ज योजना सुरु केली असून रु ३.०० लाख कर्जापर्यंत कोणतेही प्रक्रिया शुल्क आकारण्यात येणार नाही. फक्त १५ मिनिटात सोने कर्ज मंजूर करण्यासाठी बँकेने आपल्या प्रत्येक शाखेत सोने कर्ज देण्यासाठी एक समर्पित कक्ष सुरु केला आहे.